श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

| वर्ष-८, अंक-१ | जानेवारी-२०२० | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने ८ |

## डेरवण रुग्णालयात नामवंत ब्रिटिश वैद्यकीय पथकाचे शस्त्रक्रिया शिबिर

भ.क.ल. वालावलकर रुग्णालयात सन २००६ पासून डॉ. संजय देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली त्यांच्या सहकारी नामवंत ब्रिटिश डॉक्टरांचे एक वैद्यकीय पथक सेवाभावी वृत्तीने येत असते. आठवड्याभराच्या आपल्या वास्तव्यात या पथकाद्वारे विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया केल्या जातात, स्थानिक वैद्यकीय कर्मचाऱ्यांना (डॉक्टर्स, परिचारिका, पॅरामेडिकल स्टाफ) प्रशिक्षण आणि मार्गदर्शन केले जाते, रुग्णालयामार्फत परिसरातील गावांमधून चाललेल्या विविध वैद्यकीय आणि सामाजिक उपक्रमांत सहभागी होऊन या उपक्रमांना भरघोस मदतही केली जाते. डेरवणचे कार्य पाहून गेलेले आणि ज्यांनी आवर्जून वारंवार येथे येऊन सेवाकार्य केले आहे अशा या ब्रिटनस्थित वैद्यकीय व्यवसायिकांनी मायदेशी एक ट्रस्ट स्थापन केला असून त्याद्वारे निधी संकलित करून ते रुग्णालयासाठी औषधे, उपकरणे खरेदी करून पाठवितात. या शिबिरासाठी येणारे डॉक्टर्स वगैरे सर्व जण स्वखर्चाने येथे येतात आणि सेवा करतात. गेली चौदा वर्षे हा उपक्रम अखंडपणे सुरू आहे. या शिबिरामध्ये होणाऱ्या शस्त्रक्रिया किंवा उपचार हे बहुतांशी मोफतच केले जातात. रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातून तसेच महाराष्ट्रभरातून लोक या शिबिरासाठी येत असतात. गोरगरिबांना नामवंत परदेशी डॉक्टरांकडून उपचार मिळण्याची, आणि ती ही मोफत, अशी ही सुवर्णसंधी असते आणि म्हणून वर्षभर तिची प्रतीक्षा असते.

याही वर्षी दि. २६ जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२० या कालावधीत हे शिबिर डेरवण येथे होत असून त्याचे माहितीपत्रक याच अंकात अन्यत्र दिले आहे. या शिबिराला नेहमीप्रमाणेच उत्तम प्रतिसाद मिळेल अशी अपेक्षा आहे.



*श्री. विकासराव वालावलकर आणि डॉ. सुनील नाडकर्णी ब्रिटिश वैद्यकीय पथकासोबत*

।। श्री स्वामी समर्थाय नमः ।। ।। श्रीसद्गुरू सहजानंद सरस्वत्यै नमः ।।

# भ.क.ल. वालावलकर रूग्णालय रोगनिदान व संशोधन केंद्र

## सावर्डे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी

## विविध शस्त्रक्रिया शिबीर

**दि. २६.०१.२०२० ते दि. ०१.०२.२०२० उपलब्ध**

**परदेशी तज्ञांच्या उपस्थितीत**

| | |
|---|---|
| युरोलॉजी | मुतखडे व प्रोस्टेट ग्रंथी, मूत्रविकार शस्त्रक्रिया. |
| अस्थिरोग | १) मणक्यावरील शस्त्रक्रिया (ओपन किंवा दुर्बिणीद्वारे)<br>२) गुडघ्यावरील शस्त्रक्रिया उदा. ऑर्थ्रोस्कोपी, सांधा बदलणे<br>३) खुबा बदलण्याची शस्त्रक्रिया |
| डोळ्यांच्या शस्त्रक्रिया | मोतिबिंदु व कृत्रिम भिंगारोपण शस्त्रक्रिया. |
| कॅन्सर शस्त्रक्रिया | सर्व प्रकारच्या कॅन्सर शस्त्रक्रिया (इंडीयन कॅन्सर सोसायटी, महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत) |
| नाक, कान व घसा | टॉन्सिल्सच्या शस्त्रक्रिया. कानाच्या शस्त्रक्रिया |
| इंटरव्हेन्शनल रेडिओलॉजी | रक्तवाहिन्यांमधिल दोष व अडथळे तपासणी |
| जनरल सर्जरी | ॲपेंडिक्स, थायरॉईड, अल्सर, आतड्यावरील व स्वादुपिंडावरील सर्व शस्त्रक्रिया, हायड्रोसील, मुळव्याध, पित्ताशयावरील शस्त्रक्रिया. |
| गायनॅक सर्जरी | गर्भाशय ओव्हरी आजाराच्या शस्त्रक्रिया |

अशा प्रकारच्या रूग्णांची तपासणी करून शस्त्रक्रिया अत्यंत अल्प दरांत होतील. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रूग्णांनी केशरी किंवा पिवळे रेशन कार्ड तसेच आधार कार्ड आणणे आवश्यक आहे. तसेच ज्या रूग्णांना महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजनेचा लाभ घ्यावयाचा असेल अशा रुग्णांनी शिबीराच्या अगोदर ८ दिवस रूग्णालयातील महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजनेच्या कार्यालयाशी संपर्क साधावा. ज्या रुग्णांना गुडघा व खुबा बदलण्याची शस्त्रक्रिया करावयाची आहे, त्यांनी शिबीर सुरु होण्यापूर्वी किमान ८ दिवस आधी येऊन रुग्णालयातील अस्थिरोग तज्ञांची भेट घेणे आवश्यक आहे.

**तरी गरजू रूग्णांनी या संधीचा लाभ अवश्य घ्यावा असे आवाहन रूग्णालयातर्फे करण्यात येत आहे.**

ज्या रूग्णांचा मेडिक्लेम/इन्शुरन्स/महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य कार्ड आहे अशा रूग्णांनी आगाऊ सुचना व्यवस्थापनाला द्यावी.

**स्थळ - भ.क.ल. वालावलकर रूग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र कासारवाडी - सावर्डे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी.**

**दूरध्वनी - (०२३५५)२६४१३७/२६४१४९/२६४६९३ /२६४६३७**

**श्री. प्रफुल्ल गोडबोले ९८२२१२०९००, डॉ सुवर्णा पाटील ९९२१२५१६९५**

**एम. एम. सी. ॲक्रिडीएटेड सी.एम.ई. डॉक्टरांच्यासाठी २६.०१.२०२० रोजी.**

**रजिस्ट्रेशनसाठी संपर्क :- श्रुतिका मोहिरे - ७०३०५४४३५७**

# त्वचारोगांवर अत्याधुनिक उपचारांची सोय

भ.क.ल.वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयामध्ये त्वचारोग विभागांतर्गत अत्याधुनिक 'पुव्हा-मशिन' (Puva Machine) चेंबर उपलब्ध झाले आहे. या मशिनद्वारे खालील रोगांवर उपचार होतात.

१) कोड (पांढरे डाग) (Vitiligo)

२) सोरायसिस (जळवात) (Psoriasis)

३) सतत खाजणारे जुनाट त्वचारोग (Pruritic itchy skin)

वरील सर्व त्वचारोग हे जुनाट व दीर्घकालीन असतात. त्यातच कोडाला समाजात विवाहप्रसंगी नाकारले जाते. सोरायसिस, जळवाताच्या खाजणाऱ्या पांढऱ्या चट्ट्यांमुळे रुग्णाला समाजात मिसळण्याचा संकोच वाटतो. या व अशा इतर जुनाट त्वचारोगांसाठी 'पुव्हा-थेरपी' ही अद्ययावत उपचार प्रणाली आहे.

भ.क.ल.वालावलकर रुग्णालयाने या अत्याधुनिक उपचार पद्धतीसाठी चेन्नईच्या सुप्रसिद्ध Dermaindia या त्वचाविषयक उपकरणे बनवणाऱ्या भारतातील आघाडीच्या कंपनीकडून वरील मशिन खरेदी केले आहे. त्यामुळे कोड, जळवाताचे व सतत खाजणारे जुनाट त्वचारोग यांवर कमी कालावधीत प्रभावी उपचार करणे आता शक्य झाले आहे. आपल्या रुग्णालयातील त्वचारोग विभाग परिपूर्ण होत आहे. वैद्यकीय पदव्युत्तर विद्यार्थ्यांना शिकवण्याबरोबरच रुग्णांना दर्जात्मक व आधुनिक उपचार देण्यासाठी त्वचारोग विभागाने अनेक उपकरणे मागवून विभाग सज्ज केला आहे.




*पुव्हा मशिन*



*पुव्हा मशिनमध्ये रुग्णाचे स्क्रिनिंग*

नवीन सौंदर्य उपचार पद्धतीबरोबरच जुनाट त्वचारोगावरदेखील रुग्णालयाच्या ओ.पी.डी क्रमांक १० मध्ये खात्रीशीर उपचार होत आहेत.

उपलब्ध सुविधा : सर्व त्वचारोगाचे निदान, उपचार व आंतर रुग्णालयाची (ॲडमिशनची) सुविधा

१. **पुव्हा चेंबर –** (एन बी यु व्ही बी)
सोरायसिस (जळवात) यावर अत्याधुनिक मशिनद्वारे एन बी यु व्ही बी लाईट थेरपी

२. **कुष्ठरोगाचे निदान व उपचार :**
- महाराष्ट्र शासनमान्य कुष्ठरोग व निदान उपचार केंद्र,
- कुष्ठरोगाच्या निदानासाठी
  अ) स्लिट स्किन स्मीयर (कानाच्या पाळीची तपासणी)
  ब) स्किन बायॉप्सी (त्वचेच्या तुकड्याची तपासणी)
  क) नर्व्ह बायॉप्सी (नस तुकडा)
- कुष्ठरोगामुळे आलेल्या व्याधीवर व्यायामाद्वारे उपचार (फिजिओथेरपी)

३. **केमिकल पीलिंग** (Chemical Peeling)
- त्वचेवरील डाग घालवण्यासाठी वांग (Melasma)
- त्वचेवरील काळे डाग (Tanning) कमी करण्यासाठी
- मुरुमानंतरचे डाग व व्रण कमी करण्यासाठी
- त्वचेची पोत (Tone) सुधारण्यासाठी

४. **मायक्रोडर्मा अबेशन**
- त्वचेवरील मुरुमाचे खड्डे कमी करण्यासाठी
- त्वचेवरील सुरकुत्या कमी करण्यासाठी
- पिंपल्स/मोडीमुळे खडबडीत झालेली त्वचा गुळगुळीत करणे

५. **इलेक्ट्रोक्युटरी** (Electrocutery) **आणि क्रायोथेरपी** (Cryotherapy):
- त्वचेवरील चामखीळ मस काढणे
- त्वचेवरील लहान गाठी (ट्युमर) काढणे

# बालपणात अंधत्व – Retinopathy of prematurity (ROP)

हा आजार सातव्या महिन्यात जन्माला आलेले बाळ किंवा जन्मत: कमी वजन असलेल्या बाळांमध्ये दिसून येते. अर्भकांमध्ये उपचार न घेतल्यास डोळ्याला गंभीर नुकसान आणि अंधत्व येऊ शकते. म्हणूनच बालरोग नेत्रतज्ज्ञांकडून अर्भकाची तपासणी करणे महत्त्वाचे आहे. ग्रामीण कोकणातील लोकांना ही सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी भ.क.ल. वालावलकर रुग्णालयाने दि. १ डिसेंबर २०१९ रोजी अशा बालकांसाठी नेत्र तपासणी शिबिर आयोजित केले होते. या शिबिराचा लाभ ३० बालकांनी घेतला. पुण्यातील डॉ. श्वेता केळकर यांनी या बालकांच्या डोळ्यांची तपासणी केली व त्याप्रमाणे मार्गदर्शन केले. डॉ. केळकर यांनी पुण्यातून DNB ophthalmology चे शिक्षण घेतल्यावर मदुराई (तामिळनाडू) येथे दोन वर्षे फेलोशिप केली. युनिव्हर्सिटी ऑफ न्यू कॅसल, यु.के. येथेही त्यांनी Pediatric ophthalmology and visual rehabilitation या विषयात फेलोशिप केली. महाराष्ट्र मेडिकल फाउंडेशनच्या रुग्णालयात consultant ophthalmologist या पदावर कार्यरत आहेत.



*डॉ. केळकर रुग्णतपासणी करताना*

# बालरोगतज्ज्ञ (नेफ्रॉलॉजिस्ट) डॉ. उमा अली व डॉ. प्रीती शानबाग यांची भेट

लहान मुलांवरील किडनीच्या आजारांवरील उपचाराकरिता बी.के. एल. वालावलकर रुग्णालयात रविवार, दि.२४.११.२०१९ रोजी मुंबईतील बालरोगतज्ज्ञ (नेफ्रॉलॉजिस्ट) डॉ. उमा अली व डॉ. प्रीती शानबाग यांनी भेट दिली. रत्नागिरी जिल्ह्यातील विविध भागातील अनेक रुग्णांनी या सेवेचा लाभ घेतला. तसेच त्यांनी वालावलकर रुग्णालयात कार्यरत असलेल्या बालरोगतज्ज्ञ तसेच कम्युनिटीमध्ये कार्यरत असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना लहान मुलांमधील किडनीच्या आजाराविषयी मार्गदर्शन केले.



*डॉ. उमा अली, डॉ. प्रीती शानभाग आणि डॉ. मगर रुग्णतपासणी करताना*

डॉ. उमा अली यांना (नेफ्रॉलॉजिस्ट) म्हणून एकूण ४० वर्षांचा अनुभव आहे. त्यांचे विशेष योगदान म्हणजे बी.जे.वाडिया हॉस्पिटलमध्ये भारतात प्रथमच लहान मुलांसाठी डायलिसिस सेवा सुरू करणे. बालरोग डायलिसिस आणि प्रत्यारोपणाच्या सेवांच्या विकासामध्ये आणि प्रशिक्षणात त्यांचे विशेष योगदान आहे. तसेच त्या Not-for-profit Kidney Foundation च्या फाउंडर मेंबर आहेत.

डॉ. प्रीती शानबाग मुंबईच्या लोकमान्य महानगरपलिका वैद्यकीय महाविद्यालयात बालरोग विभागाच्या प्राध्यापिका आहेत. त्यांचे प्रमुख योगदान म्हणजे लहान मुलांसाठी "Peritoneal Dialysis" ची सेवा सुरू करणे हे आहे.

लहान मुलांमधील किडनीच्या आजारात पुढील लक्षणांचा समावेश असतो – हातापायाला व चेहऱ्याला सूज येणे, हिमोग्लोबिन कमी असणे, उच्च रक्तदाब, मूतखडे, आवर्ती मूत्रसंक्रमण, बेडवेटिंग, मूत्रपिंड जन्मजात दोष, किडनी रोग, मूत्रपिंड किंवा मूत्रमार्गात पसरणारे रोग, मूत्राशय समस्या ही लक्षणे असलेल्या बालकांनी दर महिन्याला या सेवेचा लाभ घ्यावा.

# 'लसीकरण मोहिमेत घेण्याची खबरदारी' – एक कार्यशाळा

दि. २८ नोव्हेंबर २०१९ रोजी डॉ. हेमंत खरनरे, वैद्यकीय दक्षता अधिकारी, राष्ट्रीय सार्वजनिक आरोग्य दक्षता प्रकल्प, भारत सरकार आणि जागतिक आरोग्य संघटना यांच्यामार्फत बी.के.एल. वालावलकर रुग्णालयात 'लसीकरण मोहिमेत घेण्याची खबरदारी' याविषयी एक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत बालरोग, कम्युनिटी हेल्थ आणि पीएसएम विभागातील सर्व कर्मचारी उपस्थित होते. या कार्यशाळेदरम्यान प्रतिकूल घटना कशा ओळखाव्यात याविषयी तसेच वेगवेगळ्या वयोगटांवर करावयाच्या विविध उपचार पद्धतींबद्दल आणि या प्रतिकूल घटना कशा टाळाव्यात याबद्दल चर्चा करण्यात आली.



*डॉ. हेमंत खरनरे कार्यशाळेत मार्गदर्शन करताना*

# विदेशी भाषा अभ्यास – अ विंडो टू द वर्ल्ड!

जागतिकीकरणाच्या आधुनिक युगातील नवीन पिढी 'बहुभाषिक' असणे अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. परदेशी भाषेत संवाद करण्यास सक्षम असण्यामुळे लोकांशी सांस्कृतिक मैत्री जोडता येते आणि आपली मूळ भाषाही चांगल्या प्रकारे समजते. वैयक्तिक, शैक्षणिक, व्यावसायिक, सामाजिक आणि आर्थिक संपन्नता हे परदेशी भाषा शिकण्याचे फायदे आहेत.

अत्यंत लहान वयातच मुलांना स्वत:च्या 'बागेपलीकडे' एक सुंदर, समृद्ध, विस्तीर्ण जग आहे हे दिसले पाहिजे. एक नवीन भाषा शिकणे म्हणजे मुलांना त्यांची क्षितिजे विस्तारण्याची उत्तम संधी देणे, त्यांच्या आयुष्याला एक नवा दृष्टिकोन प्राप्त करून देणे होय. विद्यार्थ्यांना विविध भाषांविषयी आवड निर्माण व्हावी, देशांविषयी आपुलकी निर्माण होऊन 'वसुधैवकुटुंबकम्' ही भावना वृद्धिंगत व्हावी, आपले भविष्य समृद्ध करण्यासाठी विविध देशांमध्ये कारकीर्द घडवणे सुलभ जावे यासाठी डेरवण येथील श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित इंग्रजी माध्यमाच्या शाळेत इ. ५ वीपासून जर्मन व स्पॅनिश भाषा शाळेतच विद्यार्थ्यांना शिकविल्या जातात. इयत्ता तिसरी व चौथीतील विद्यार्थ्यांना स्पॅनिशची तोंडओळख होण्यासाठी 'Budding Spanish' चे वर्ग घेतले जातात.

स्पॅनिश शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्याला एक व्यासपीठ देण्यासाठी दरवर्षी 'स्पॅनिश डे' शाळेत साजरा केला जातो. नुकत्याच संपन्न झालेल्या ह्या कार्यक्रमाला डॉ. सुषमा जोगळेकर, अध्यक्ष, स्थापत्यशास्त्र अभ्यासक्रम मंडळ, मुंबई विद्यापीठ आणि डॉ. नितीन जोगळेकर, स्त्रीरोग तज्ज्ञ व एक बहुभाषिक व्यक्तिमत्त्व सन्माननीय पाहुणे म्हणून लाभले. दीप प्रज्वलन, स्वागत गीत व ईशस्तवनाने कार्यक्रमाला मंगलमय सुरुवात झाली. शाळेच्या संचालिका सौ. शरयू यशवंतराव यांनी पाहुण्यांचे शाल, श्रीफळ,




*डॉ. नितीन जोगळेकर स्पॅनिश-डे निमित्त आपले विचार व्यक्त करताना*




*'गणेशकार्तिकेय यांची पृथ्वी प्रदक्षिणा' गोष्टीचे स्पॅनिशमधून सादरीकरण*

मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व स्पॅनिश भाषा वर्ग सुरू करण्यामागची शाळेची भूमिका व विविध स्पॅनिश उपक्रम विशद केले. प्रमुख पाहुणे डॉ. नितीन जोगळेकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना लहान वयातच नवीन भाषा शिकण्याचा बहुमोल सल्ला दिला. आपण नव्याने शिकलेल्या भाषेचा सतत सराव केला पाहिजे व त्या भाषेचे व्याकरण पक्के केले पाहिजे असे ते म्हणाले. परदेशी भाषा शिकण्याने आपल्याला त्या देशाची संस्कृती कळते, मैत्रीपूर्ण संबंध तयार होतात तसेच उच्च शिक्षण व व्यवसायाचे एक विशाल क्षेत्र खुले होते. शाळेच्या अटल टिंकरींग लॅबमध्ये विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक कल्पना प्रत्यक्षात उतरविण्याची संधी मिळते हे पाहून आपण प्रभावित झाल्याचे ते पुढे म्हणाले.



*बाळाच्या खऱ्या आईची ओळख पटविणारी नाटिका सादरीकरण अर्थातच स्पॅनिशमधून*

'स्पॅनिश डे' साजरा करताना प्राथमिक ते उच्चमाध्यमिक गटातील विद्यार्थ्यांनी स्पॅनिश भाषेतून विविध कलाकृती सादर केल्या. माध्यमिक गटातील विद्यार्थ्यांनी बंगाली भाषेतून देशभक्तिपर गीत सादर केले. इयत्ता ३ री व ४ थीच्या विद्यार्थ्यानी स्पॅनिश भाषेतील कविता नृत्यांद्वारे सादर केल्या. बुद्धिबळातील पात्रांनी खेळातील आपापल्या चालींचे नियम तसेच 'गणेशकार्तिकेय यांची पृथ्वी प्रदक्षिणा' ही गोष्ट स्पॅनिशमधून विद्यार्थ्यांनी सादर केली. बालवयातील रवींद्रनाथ टागोर यांची खोडकर व जिज्ञासू वृत्ती दाखवून देणारा एक गमतीदार प्रसंग विद्यार्थ्यांनी नाटिकेद्वारे स्पॅनिश भाषेत सादर केला. स्पॅनिश गीतावर नृत्य सादर केले व बाळाच्या खऱ्या आईची ओळख पटविणारी नाटिका विद्यार्थ्यांनी सादर केली. स्पॅनिश आंतरराष्ट्रीय परीक्षा स्तर १ व स्तर २ च्या विद्यार्थी गटांत स्पॅनिश शब्दांची अंताक्षरी स्पर्धा प्रेक्षकांसमोर थेट सादर करून विद्यार्थ्यांनी चुरस व विपुल स्पॅनिश शब्द संपत्तीचे दर्शन घडविले. 'दादी अम्मा दादी अम्मा मान जाओ' या हिंदी गाण्याचे स्पॅनिश



*नाताळाची गाणी सादर करताना प्राथमिक विभागाचे विद्यार्थी*

भाषांतर सुरेल चालीत सादर करून विद्यार्थ्यांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने रूचा कोवळे व रिया महाडीक यांनी स्पॅनिश भाषा शिक्षणातील स्वानुभव व व्यावसायिक संधी आपल्या संवादातून विशद केल्या. या सर्व कार्यक्रमांना उपस्थित प्रेक्षकवर्गाने भरभरून दाद दिली.

वर्षभर चालणाऱ्या स्पॅनिश भाषा अभ्यासाच्या उपक्रमांमध्ये यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना सन्माननीय पाहुण्यांच्या हस्ते बक्षिसे प्रदान करून गौरविण्यात आले.

शाळेच्या स्पॅनिश भाषा शिक्षिका डॉ. कृपा कुलकर्णी, मुख्याध्यापिका श्रीम. प्रज्ञा पारकर, श्रीम. उज्ज्वला जुन्नरकर, श्री. कल्पेश जुवेकर व सर्व शिक्षकांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी श्रद्धा निमुणकर व प्रियल निमुणकर यांनी केले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यासाठी संस्थेचे प्रमुख विश्वस्त श्री. अशोकराव जोशी, संस्थेतील अनेक मान्यवर, पालक, शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.



*'दादी अम्मा दादी अम्मा' स्पॅनिश भाषेत सादर करताना*

# डेरवण येथे शासकीय शिष्यवृत्ती परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा




*सराव प्रश्नपत्रिका संचाचे अनावरण करताना सर्व मार्गदर्शक*

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित इंग्रजी माध्यमाच्या शाळेत एक दिवसीय शासकीय शिष्यवृत्ती परीक्षा प्रशिक्षण तसेच शिक्षक व विद्यार्थी मार्गदर्शन कार्यशाळा नुकतीच संपन्न झाली. गेली २२ वर्षे डेरवण येथील श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिष्यवृत्ती मार्गदर्शन कार्यशाळा, इंग्रजी व मराठी माध्यमासाठी विनामूल्य घेण्यात येते. या कार्यशाळेत सहभागी विद्यार्थ्यांना तीन प्रश्नपत्रिका असलेल्या सराव पुस्तिकेचे मोफत वाटप केले जाते. शिष्यवृत्ती मार्गदर्शनाचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या सौ. अमिता पंडित, सौ. अंजली अवधूतकर, सौ. मेघना देशमुख, श्री. नामदेव धनावडे व श्री. संपत शेलार यांनी प्रथम व द्वितीय भाषा, गणित व बुद्धिमत्ता चाचणी या विषयांचे मार्गदर्शन केले. या पाचही तज्ज्ञांचे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद येथे अभ्यासक्रम निर्मिती, शिष्यवृत्तीसाठी पुस्तक लिखाण, पेपर सेटिंग यामध्ये महत्त्वाचे योगदान आहे. या वर्षीच्या कार्यशाळेस चिपळूण तालुक्यातील २७ शाळांमधून २६५ विद्यार्थी तसेच शिक्षक व पालक सहभागी झाले होते. स्पर्धा परीक्षेसाठी लागणारी विविध प्रकारची तयारी ह्या कार्यशाळेतून करून घेण्यात येते. शिष्यवृत्ती परीक्षेसाठी प्रश्न सोडवत असतांना लागणाऱ्या क्लुप्त्या, वेळेचे नियोजन, समयसूचकता, परीक्षेसाठीची पूर्व तयारी, शारीरिक व मानसिक तयारी, विद्यार्थ्यांना असलेले अभ्यासप्रश्न, अशा सर्वच गोष्टींचे मार्गदर्शन तज्ज्ञ मार्गदर्शकांनी केले.

कार्यशाळेच्या यशस्वितेसाठी मुख्याध्यापिका प्रज्ञा पारकर, उज्ज्वला जुन्नरकर, कल्पेश जुवेकर, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.



*विविध शाळांतून सहभागी विद्यार्थी व शिक्षक*

# डेरवण क्रिडासंकुलात राज्यस्तरीय जिम्नॅस्टिक्स स्पर्धा संपन्न




*महाराष्ट्र हौशी जिम्नॅस्टिक्स संघटना- ५४ व्या सब-ज्युनिअर आणि मिनी आर्टिस्टिक जिम्नॅस्टिक्स स्पर्धेचे उद्घाटन करताना श्री. अजित गाळवणकर, सोबत संघटनेचे पदाधिकारी*

महाराष्ट्र हौशी जिम्नॅस्टिक्स संघटना आणि 'श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट'चे क्रीडासंकुल यांच्या संयुक्त विद्यमाने ५४ व्या सब ज्युनिअर आणि मिनी आर्टिस्टिक जिम्नॅस्टिक्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. दि. १४ आणि १५ डिसेंबर या कालावधीत अत्यंत जोषपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या स्पर्धेत महाराष्ट्रातील १८ जिल्ह्यातील १०, १२ आणि १४ वर्षे वयोगटातील २९० खेळाडूंनी आपले कौशल्य पणाला लावले.

स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी 'महाराष्ट्र हौशी जिम्नॅस्टिक्स संघटने'चे तांत्रिक समिती प्रमुख प्रवीण ढगे यांच्याबरोबर पदाधिकारी संदीप जोशी, संजीवनी पूर्णपात्रे, मयुरेश एकबोटे, सचिन मांडवकर, तसेच खजिनदार पवन भोईर उपस्थित होते. खेळाडूंच्या शिस्तबद्ध संचलनानंतर स्वागत गीत आणि दीप प्रज्वलन संपन्न झाले. यानंतर

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र**
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : (०२३५५) २६४१४९ / २६४६३६ / २६४६३७ फॅक्स : (०२३५५) २६४१८१
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com






स्पर्धेचे उद्‌घाटन 'एसव्हीजेसीटी'च्या क्रीडा मार्गदर्शक समितीचे सदस्य श्री. अजित गाळवणकर यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले. 'खेळाडू हाच केंद्रबिंदू ठेवून हे क्रीडासंकुल सर्व खेळाडू आणि त्यांचे प्रशिक्षण यासाठी नेहमीच तयार असेल; आलेल्या सर्व खेळाडूंनी येथे वारंवार येऊन आपले कौशल्य वाढवावे' असे आवाहन याप्रसंगी गाळवणकर यांनी केले. संघटनेतर्फे खेळाडूंना शुभेच्छा देतांना पवन भोईर यांनी हे क्रीडासंकुल जिम्नॅस्टिक्स स्पर्धा आयोजित करण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आले हा खेळाडूंच्या कारकिर्दीसाठी अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे हे सांगून संस्थेचे आभार मानले. येथे असलेल्या सर्व सुविधा आणि जिम्नॅस्टिक्ससाठीची नवीन साधने ही अतिशय उत्तम असून त्यावर खेळतांना खेळाडूंचे नैपुण्य वाढेल यात शंकाच नाही असेही त्यांनी आवर्जून सांगितले.

मुंबई, कोल्हापूर, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, अमरावती, लातूर यासारख्या विविध जिल्ह्यातून आलेल्या खेळाडूंनी दर्जेदार खेळाचे प्रदर्शन केले. स्पर्धेसाठी अनेक नामवंत प्रशिक्षक आपल्या संघांसह उपस्थित होते त्या सर्वांनीच क्रीडासंकुलातील सर्वच सुविधा उत्तम असल्यामुळे स्पर्धा विनाअडथळा संपन्न झाली यासाठी आनंद व्यक्त केला.





**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्री. विकासराव वालावलकर यांनी मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे-३० येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले. । Visit us at https://swamisamarth.com/dervan/
**संपादिका :** डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५, **संपादक मंडळ :** सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०